**क्रमांक : ५**

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**गुरुवार, दिनांक १९ जानेवारी, २०२३ / पौष २९, १९४४ (शके)**

### लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**५.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन गुरुवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ५७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ६ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण ५१ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी १५ लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. प्रलंबित ३६ निवेदनांपैकी १३ निवेदने गुरुवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. त्यानंतर प्रलंबित २३ निवेदनांपैकी ९ निवेदने गुरुवार, दिनांक १ डिसेंबर, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. आता १४ निवेदनांपैकी ८ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १९ जानेवारी, २०२३**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

<u>लक्षवेधी सूचना</u>

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय ( पावसाळी ) अधिवेशन

श्री. अभिमन्यु पवार, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"३० सप्टेंबर १९९३ मध्ये झालेल्या प्रलयंकारी भूकंपात लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील ५२ पेक्षा अधिक गावे जमीनदोस्त झाली आणि जवळपास २ लक्ष घरांना तडे जाऊन क्षतिग्रस्त झाली असणे. ७ हजार पेक्षा अधिक नागरिक तर लाखो जनावरे मयत झाली असणे, या जमीनदोस्त गावांचे पुनर्वसन राज्य शासनाने केले असणे, सदरील पुनर्वसन अंतर्गत बांधण्यात आलेली अनेक गावातील घरे निकृष्ट दर्जाची बांधण्यात आल्यामुळे आजरोजी राहण्यालायक राहिली नसणे, गावातील शासकीय इमारतींची, अंतर्गत रस्ते, नाली, आदींची दुरावस्था झाली असणे, पुनर्वसित गावातील घर वाटपांची प्रकरणे आजरोजी प्रलंबित असून अनेक लाभार्थी घरापासून वंचित असणे, भूकंपग्रस्त क वर्गवारीच्या गावातील घरे भूकंपाच्या भीतीपोटी तत्कालीन स्थितीत नागरिकांनी गायराण गावठाण मध्ये तात्पुरत्या स्वरुपात निर्माण करुन राहिली असून अनेक नागरिकांनी गावाशेजारील खाजगी जमिनीत अनोंदकृत १०० रु. च्या बॉन्डवर खरेदी वा तोंडी समत्तीने प्लॉट खरेदी करुन घरे बांधली असणे, सदरील घरे भोगवटयात नोंद असणे, परंतु मालकीहक्कत नसल्याने या लाभार्थ्यांना शासनाच्या घरकुल योजना तसेच बँक कर्जाच्या लाभपासून वंचित राहावे लागणे, भूकंपामुळे विस्तारित वस्तीत मूलभूत सुविधांचा अभाव असणे, राज्य शासनाच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्था व निमशासकीय विभागातील भूकंपग्रस्त नागरिकांचा नौकरीचा अनुशेष शिल्लक असल्याने हजारो भूकंपग्रस्त प्रमाणपत्रकधारक नौकरीच्या प्रतीक्षेत असणे,भूकंपग्रस्त भागात सुशिक्षित बेरोजगारीचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढलेले असणे, त्यासाठी एमआयडीसी साठी भूसंपादण करुन विकसित करण्याची तसेच रोजगार निर्मितीसाठी एखादा मोठा प्रकल्प सदर परिसरात सुरु करण्याची व भूकंपग्रसतांचे जीवनमान उंचवण्याची नितांत गरज असणे, नैसर्गिक वाढीअंतर्गत सर्व कुटुंबाना घरे व जागा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक गावासाठी अतिरिक्त भूसंपादण करण्याची गरज असणे, मौजे कारला व कुमठा ता. औसा या गावांचे पुनर्वसनासाठी जिल्हाधिकारी लातूर यांनी सादर केलेला प्रस्ताव तांत्रिक करणाने राज्य शासन स्तरावर गेली अनेक वर्षापासून प्रलंबित असणे. भूकंपाला २९ वर्ष पूर्ण होत असतानाही भूकंपातील मूलभूत प्रश्न व गरजा प्रलंबित असून भूकंपग्रस्त भागातील क वर्गवारीच्या गावातील गायरण गावठाण व इतर शासकीय जमिनीत तसेच गावाशेजारील खाजगी जमिनीत अंनोदणीकृत पध्दतीने प्लॉट पाडून खरेदी केलेली प्लॉट व घरे नियमित करण्याबाबत तसेच नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि विकासाचा अनुशेष व रोजगारांच्या संधी, आरोग्याच्या सुविधा, मूलभूत गरजा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने विशेष निधी मंजूर करण्याबाबत करवायची कार्यवाही व शासनाची भूमिका. "

<u>मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन</u>

शासनाच्या धोरणानुसार भुकंप पुनर्वसनांतर्गत भुकंपग्रस्तांना घरे बांधून देऊन त्यांचे पुनर्वसन त्यावेळी करण्यात आलेले आहे. भुकंप पुनर्वसनात बांधलेली घरे, शासकीय इमारती, ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी, अंतर्गत रस्ते-नाली इत्यादी यांच्या देखभाल व दुरुस्तीची कामे व त्यासाठी खर्चाची तरतूद संबंधित लातूर व उस्मानाबाद जिल्हा परिषदेने करणे अपेक्षित आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये आज रोजी पात्र लाभार्थी यांना घर वाटपाची कार्यवाही पूर्ण झाली आहे. लातूर जिल्ह्यातही बहुतांश पात्र लाभार्थींना घरांचे वाटप झालेले आहे, तथापि काही अंशी घरांचे वाटप प्रलंबित आहे.

गट " क" वर्गवारीतील गावांमध्ये खाजगी जमिनीत अनोंदणीकृत बाँडवर खरेदी करुन बांधलेल्या घरांचे मालकी हक्क नियमित करण्याकरीता संबंधित तालुक्यांच्या तहसिलदारांना नियोजन प्राधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, लातूर यांनी दि. ३१.०१.२०१८ च्या आदेशान्वये प्राधिकृत केले आहे. तहसिलदारांनी नोंदणी विषयक प्रमाणपत्र निर्गमित केल्यानंतर संबंधित ग्रामपंचायत नमूना क्र. ८ चा उतारा निर्गमित करेल. याचप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना दि. १७.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

शासनाच्या धोरणानुसार भुकंपग्रस्तांसाठी २%आरक्षण निश्चित करण्यात आलेले आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत महास्वयंम या संकेतस्थळाच्या माध्यमातून ऑनलाइन पध्दतीने उमेदवारांच्या नोंदणीची सेवा पुरविण्यात येते.

गावठाण विस्ताराच्या अनुषंगाने लातूर जिल्ह्यामध्ये कार्यवाही सुरु आहे. तसेच सद्यस्थितीत उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये असा प्रस्ताव प्राप्त नाही.

मौजे कारला कुमठा या गावांच्या पुनर्वसनाच्या प्रस्तावासंदर्भात शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे. याशिवाय नमूद करण्यात येते की, त्याठिकाणच्या नागरीकांचे जीवनमान उंचावण्यासाठी, विकास, रोजगारांच्या संधी, आरोग्य सुविधा व मूलभूत गरजा यासाठी शासनाच्या विभागांमार्फत कार्यरत असलेल्या विविध योजनांमधील कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

************

## लक्षवेधी सूचना

**प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबईतील धारावी वस्तीची जागतिक जागतिक पातळी ओळख असून फेब्रुवारी २००४ मध्ये धारावी विकासाची सुरूवात होणे, २०१९ ला याकरिता निविदा काढण्यात येणे, त्याप्रमाणे २०१३ ला एक सेक्टरचे काम म्हाडाच्या माध्यमातून सुरू करण्यात येणे, धारावी विकासासाठी रेल्वेच्या ताब्यात असलेली जमिनीचे हस्तांतरण न झाल्यामुळे धारावीच्या विकासात अडचणी निर्माण झालेल्या असताना या संदर्भात ८०० कोटी रेल्वेला देऊनही जमीन हस्तांतरण करण्याची प्रक्रिया अद्यापही पूर्ण न होणे, त्यामुळे निविदा स्थगित झालेला असून त्यासाठी पुन्हा निविदा काढण्यात येणे, २००४ पासून धारावी विकास थांबला असल्यामुळे स्थानिक जनतेमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून धारावी विकासासाठी तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाचे प्रतिक्रिया."

## मा. उप मुख्यमंत्री, गृहनिर्माण यांचे निवेदन

गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र.झोपुयो २००३/प्र.क्र.१८९/झोपुसु-१, दिनांक ०४.०२.२००४ अन्वये आशिया खंडातील सर्वात मोठ्या झोपडपट्टी व्याप्त अविकसित धारावी क्षेत्राचा सेक्टर संकल्पनेवर आधारित एकत्रित सर्वंकष विकास करण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र.धापुप्र-२०१८/प्र.क्र.९०/झोपसु, दिनांक ०५.११.२०१८ नुसार धारावी पुनर्विकास प्रकल्पातील सेक्टर १ ते ५ या सर्व सेक्टर्सचा विशेष हेतू कंपनीच्या माध्यमातून एकत्रित विकास करणेबाबत धारावी पुनर्विकास प्रकल्पामार्फत मुख्य भागीदाराची निवड करण्यासाठी माहे नोव्हेंबर २०१८ मध्ये जागतिक निविदा मागविण्यात आल्या होत्या. दरम्यान, धारावी अधिसुचित क्षेत्रातील व अधिसुचित क्षेत्रालगत माटुंगा/दादर येथील रेल्वेची सुमारे ४५ एकर जमिन धारावी पुनर्विकास प्रकल्पात समाविष्ट करण्याकरिता रेल भुमी विकास प्राधिकरण (Rail Land Development Authority - RLDA) व धारावी पुनर्विकास प्रकल्प/ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्यात दिनांक ०३.०३.२०१९ रोजी सामंजस्य करार निष्पादित करण्यात आला त्यानूसार

दि.१५.०६.२०१९ रोजी साम्यंजस्य करारातील तरतुदी व शासन निर्णय दिनांक २८.०५.२०१९ नुसार रु.८०० कोटी रक्कमेचा आगाऊ भरणा (Upfront Amount) रेल भुमी विकास प्राधिकरणास करण्यात आला आहे. तथापि, धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी रेल्वेच्या जागेच्या हस्तांतरणाबाबत रेल्वेसोबत दिनांक ०३.०३.२०१९ रोजी झालेल्या सामंज्यस्य करारातील अटी व शर्तीचा निविदेमध्ये समावेश नसल्याने आणि रेल्वेच्या जागेचा समावेश निविदा प्रक्रियेच्या पश्चात झाल्याने मा. महाधिवक्ता यांचे याबाबतचे अभिप्रायानुसार माहे नोव्हेंबर २०१८ रोजी सुरु केलेली धारावी पुनर्विकास प्रकल्पाची निविदा रद्द करण्याची व फेर निविदेसह नव्याने सुधारित निविदा मागविण्याचा तसेच सदर प्रक्रियेस मा. मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मा. मंत्रिमंडळाने दिनांक २९.१०.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये सचिव समितीचा निर्णय कायम केला. त्यानुसार गृहनिर्माण विभागाने शासन निर्णय क्रमांक धापुप्रा-२०२०/प्र.क्र.८२/झोपसू, दिनांक ०५.११.२०२० रोजी निर्गमित केला.

धारावी पुनर्विकास प्रकल्प आणि रेल भूमि विकास प्राधिकरण यांच्यामध्ये दि.१८.१०.२०२२ रोजी ९९ वर्षाकरिता (Lease Deed Agreement) करण्यात आले आहे. दि.२९.११.२०२२ रोजी अधिक्षक, भूमि अभिलेख, मुंबई शहर यांना मोजणी फी रक्कम रु.२८,५३,०००/- भरण्यात आली असून दि.१९.१२.२०२२ पासून मोजणीचे काम सुरुवात करण्यात येत आहे, असे अधिक्षक,मुंबई नगर भूमापन व भूमि अभिलेख (शहर) यांनी कळविले आहे. दिनांक ०५.११.२०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार माहे नोव्हेंबर २०१८ मध्ये सुरु असलेली धारावी पुनर्विकास प्रकल्पाची निविदा दिनांक ११.११.२०२० रोजी रद्द करण्यात आली. नविन जागतिक ई-निविदा दि.०१.१०.२०२२ रोजी काढण्यात आल्या. धारावी पुनर्विकास प्रकल्पाकरिता प्राप्त झालेल्या पात्र निविदाकारांच्या आर्थिक निविदा (तांत्रिक मूल्यांकनानंतर) उघडण्यात आल्या असून सचिव समिती स्तरावर सदर बाब विचारार्थ ठेवण्यात आली आहे. शासनाच्या मंजुरीनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

*********

**विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना.**
**सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन**

**श्री. धर्मरावबाबा आत्राम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

मौजा टाकळी, ता. नागपूर (ग्रामीण) जि. नागपूर येथील सर्व्हे नं. ४६, ५९ व ६० शेतजमीन ही ७/१२ रेकॉर्ड व अधिकार अभिलेख पंजी व इतर सरकारी कागदोपत्री मारोती मंदिर देवस्थान म्हणून नोंदविण्यात आलेली असणे, मारोती मंदिर देवस्थान हे मा. धर्मदाय आयुक्त यांच्या कार्यालयात नोंदणीकृत असून त्यांचा नोंदणी क्र. ऐ १२१६ (एन) असून सदर शेतजमीनीची संस्थेच्या शेडयुल-१ वर सुध्दा नोंद असणे. श्री गौतम पुरी गोस्वामी यांचे वडील स्वर्गीय रमेश पुरी गुरु महेश पुरी व अन्य यांची वहिवाटदार म्हणून देवस्थानच्या ७/१२ रेकॉर्डवर नोंद असणे, त्यांचा गैरफायदा घेऊन गौतमपुरी यांनी तहसिलदार यांच्याशी संगनमत करून त्यांची त्यांचे इतर नातेवाईक यांची नांवे दर्ज विनंती करणे. तहसीलदार नागपूर ग्रामीण यांनी कुठलीही शहनिशा न करता गौतमपुरी व इतर नातेवाईकांची नावे ७/१२ रेकॉर्डवर त्यांच्या दि १४/२/२०२२ च्या आदेशानुसार नोंद करणे. स्वत:च्या आर्थिक फायद्याकरिता गौतमपुरी यांनी सदर मालमतेची अंजनी वाटीका फार्म या बिल्डीरशी परस्पर विक्रीचा करार करुन विश्वस्त संस्थेची म्हणजेच मारोती मंदिर देवस्थान या संस्थेची फसवणूक केली असल्याचेही निदर्शनास येणे, सदर प्रकरणामध्ये तलाठी व ग्रामसेवक यांनी त्यांच्या निरीक्षण पत्रात सदर मालमतेवर मारोती देवस्थानचे नाव सरकारदप्तरी नमुद आहे व त्याबाबत मा.धर्मदाय कार्यालयाचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे असे त्यांच्या अहवालात नमुद असून सुध्दा मा. तहसिलदार (ग्रा) नागपूर यांनी धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडून कुठलीच शहानिशा न करता तसेच अर्जदार व इतर संबंधीत लोकांना नोटीस न बजावता आपल्या अधिकार क्षेत्राबाहेर जावून बेकायदेशीररित्या गौतमपुरी गोस्वामी व इतरांची नावे ७/१२ रेकॉर्डवर चढविली असणे, याप्रकरणी संस्थेचे अध्यक्ष श्री. राजेश मदन पुरी यांनी सदर आदेशाविरुध्द मा. एस.डी.ओ. यांचे समोर अर्ज सादर केली असून याप्रकरणात त्यांना मा. एस.डी.ओ. नागपूर ग्रामीण यांनी स्थगिती देण्यात आली असल्याचे निदर्शनास येणे, तथापि सदर प्रकरण एस.डी.ओ. यांच्या कार्यालयात दाखल असून सुध्दा मा. तहसीलदार नागपूर ग्रामीण यांनी त्यांच्या दिनांक दि. १३ मे, २०२२ च्या आदेशाप्रमाणे देवस्थानची मालमत्ता वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये परिवर्तीत करुन पुन्हा श्री. गौतमपुरी गोस्वामी यांना आर्थीक हव्यासापोटी मदत केल्याचे निदर्शनात दिसून येणे, परिणामी मा. तहसीलदार नागपूर ग्रामीण यांनी दिनांक १४/०२/२०२२ व दि. १३/०५/२०२२ रोजी दिलेल्या आदेश हा पुर्णत: बेकायदेशीर असणे, त्यांचे तात्काळ निलंबीत करुन सदर प्रकरणी चौकशी करून सर्वसंबंधितां विरुध्द (मा. तहसिलदारासह) कारवाई करण्याची करण्यात आलेली मागणी, व त्याबाबत शासनाने केली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

---

**श्री.राधाकृष्ण विखे पाटील मा.मंत्री, महसूल यांचे निवेदन.**

मौजा टाकळी प. ह. नं. ३६, ता. नागपूर ग्रा. येथील नवीन खसरा क्रमांक ४६, ५९, ६० आराजी अनुक्रमे २.६०, ०.२६ व ३.५५ हे. आर. एकूण ६.४१ हे. आर. शेत जमीन १९५४-५५ अधिकार अभिलेख पंजीच्या नोंदीनुसार मारोती देवस्थान टाकळी तर्फे वहिवाटदार गोविंदा रघूनाथ व रमेशपुरी अज्ञान गुरु महेश पुरी यांचे नावाने दर्ज होती.

वहिवाटदार गोविंदा रघूनाथ तिडके दि. २१/०८/१९६७ रोजी मृत्यू पावले असून त्यांचे मृत्यूनंतर शंकर, प्रभाकर, रामभाऊ, लक्ष्मण, मधूकर पिता गोविंदराव यांचे वारसान म्हणून अभिलेखात दर्ज आहे. सबब, तेव्हाचे प्रचलित ७/१२ (अधिकार अभिलेख) नोंदीनुसार मारोती देवस्थान तर्फे वहीवाटदार रमेश पुरी गुरु महेश पुरी व शंकर, प्रभाकर, रामभाऊ, लक्ष्मण, मधूकर पिता गोविंदराव तिडके अशी एकूण ६ (सहा) नावे दर्ज आहे.

वहिवाटदार रमेश पुरी गुरु महेश पुरी यांचे मृत्यूनंतर वारसान अर्जदार श्री. गोस्वामी गौतम पुरी गुरु रमेश पुरी यांनी दिनांक २३/०६/२०२१ रोजी मयत खातेदारांच्या वारसानांची नोंद करण्याबाबत केलेल्या अर्जास अनुसरुन महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम १४९, १५०, महाराष्ट्र जमीन महसुल अधिकार अभिलेख व नोंदवह्या (तयार करणे व सुव्यवस्थीत ठेवणे) नियम १९७१, हिंदु उत्तराधिकार कायदा, १९५६ चे कलम ८ मधील तरतुदीनुसार मृतक रमेश पुरी गुरु महेश पुरी यांचे मृत्युनंतर वारसान अर्जदार गोस्वामी गौतम पुरी गुरु रमेश पुरी, सुवर्णा महेश पुरी, सिता दिलीप टिनगुरीया, पद्मा विजय तिवारी, अनुराधा राजेंद्र तिवारी व मनिषा रमेश पुरी यांची नावे वारसान म्हणून तलाठी अभिलेखात दर्ज करण्याबाबत दिनांक १४/०२/२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशास अनुसरुन हितसंबंधितांना सुचनापत्र व अन्य आवश्यक असलेली कार्यवाही पूर्ण करुन फेरफार क्रमांक ८७७ दिनांक १६/०३/२०२२ रोजी प्रमाणित करण्यात आलेला आहे. श्री. राजेश मदन पुरी यांनी सदर

कार्यवाही विरुद्ध दिनांक १३/०६/२०२२ रोजी उप विभागीय अधिकारी, नागपूर (ग्रा.) यांचेकडे अपील दाखल केली असून तद्नुषंगाने "जैसे थे परिस्थिती (Status Quo)" आदेश पारीत केलेला आहे. सद्यस्थितीत सदर अपील प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

तलाठी यांनी त्यांच्या निरीक्षण पत्रात सदर मालमत्तेवर मारोती देवस्थानचे नाव सरकारदप्तरी नमुद आहे व त्याबाबत धर्मदाय कार्यालयाचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे असे नमूद असले तरी महसुली अभिलेख नोंदीनुसार मौजा टाकळी, प. ह. नं. ३६ येथील खसरा क्रमांक ४६, ५९, ६० मारोती देवस्थान तर्फे वहिवाटदार रमेश पुरी गुरु महेश पुरी व गोविंदराव यांचे पाच वारसान यांची नावे वहिवाटदार म्हणून दर्ज असून सदर देवस्थान मा. धर्मदाय आयुक्त यांचेकडे पंजीबद्ध केल्याचे व वहिवाटदार विश्वस्त असल्याबाबत अभिलेखात कुठेही नोंद नाही. त्यामुळे सदर शेत जमीनीचे महसुली अभिलेखात मृतक वहिवाटदाराचे नाव कमी करुन केवळ मृतक वहिवाटदाराचे वारसानांची नावे दर्ज करण्याकरीता धर्मदाय आयुक्त यांचे मार्गदर्शन घेण्याची आवश्यकता नाही.

मारोती देवस्थान तर्फे वहिवाटदारानी प्रश्नाधीन शेत जमीन महसुली अभिलेख नोंदीनुसार भोगवटदार वर्ग २ दर्ज असल्याने सदर जमीनीचे भोगवटदार वर्ग १ हक्कात रुपांतर करणेबाबत केलेल्या अर्जास अनुसरुन प्रश्नाधिन जमीन देवस्थानाचे नावावर दर्ज असल्यासंबंधी खात्री करुन तसेच सदर देवस्थान धर्मदाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत नसल्याची व मंदिर कमेटी म्हणून ७/१२ मध्ये दर्ज असलेले वहिवाटदार प्रश्नाधिन शेत जमीनीची देखभाल करीत असल्याने तसेच सदर शेत जमीन पुर्वापार खाजगी व्यक्ती (वहिवाटदार) यांचेच नावाने दर्ज असून शासनाकडून उक्त जमीन देण्यात आली नसल्याची खात्री करण्यात आली व तद्नंतरच भोगवटदार वर्ग २ चे वर्ग १ हक्कात रुपांतर करण्याबाबत शासन स्तरावरुन महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २१ एप्रिल, २०१८ नुसार प्राप्त आदेश/निर्देशास अनुसरुन महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम २९ (२) (क) नुसार शेतजमीन भोगवटदार वर्ग १ हक्कात रुपांतरीत करण्याचे दिनांक १३/०५/२०२२ रोजी आदेश निर्गमीत करण्यात आले.

वारसान वहिवाटदारांच्या नोंदी तसेच भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करण्याबाबत केलेल्या कार्यवाही प्रकरणी चौकशीत कोणत्याही व्यक्तीने उजर/आक्षेप दर्ज केलेला नाही. तसेच अपिलार्थी श्री. राजेश मदन पुरी यांचा अभिलेख नोंदीनुसार सदर शेतजमीनीशी कुठेही संबंध दिसून येत नसल्याने या प्रकरणी त्यांना सुचना देण्याचा किंवा त्यांचेकडून अभिप्राय घेण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

श्री. राजेश मदन पुरी यांनी दिनांक १४/०२/२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशाविरुद्ध केलेल्या अपील प्रकरणात जोडलेल्या कागदपत्र पुराव्यावरुन मारोती देवस्थानची नविन कार्यकारणी तयार करुन धर्मदाय आयुक्त, नागपूर यांचेकडे केलेल्या अर्जास अनुसरुन सदर कार्यालयाच्या दि. २९/०३/२०२२ रोजी च्या आदेशानुसार कार्यकारणीस मंजुरी दिल्याचे निदर्शनास येते. तथापी सदर कार्यकारणीत पुर्वापार अभिलेख नोंदीनुसार दर्ज असलेल्या कोणत्याही वहीवाटदारांचा सदस्य म्हणून समावेश केल्याचे दिसून येत नाही. तेव्हा जुन्या वहिवाटदारानी सदर देवस्थान कार्यकारणी नोंदणीबाबत पारीत केलेल्या आदेशाविरुद्ध सक्षम अपीलीय प्राधिकरणाकडे अपील केल्याचे निदर्शनास आलेले आहे. तथापी सदर अपील प्रकरण सुद्धा न्यायप्रविष्ठ असल्याने अभिलेख नोंदीनुसार वहिवाटदारांचे हक्क व अधिकार तसेच नविन कार्यकारणी बाबत सद्यस्थितीत कोणतेही भाष्य करता येत नाही.

देवस्थान कमेटी वहिवाटदार यांनी सदर शेत जमीन भोगवटदार वर्ग १ हक्काने धारण केली असली तरी सदर वहिवाटदारास सर्व भोगवटदाराचे सम्मतीशिवाय तसेच महाराष्ट्र पब्लीक ट्रस्ट ॲक्ट, १९५० चे कलम ३६ अन्वये धर्मदाय आयुक्तांची पूर्व परवानगी शिवाय सुध्दा विक्री विल्हेवाट करता येत नाही.

श्री. राजेश मदन पुरी यांनी उप विभागीय अधिकारी, नागपूर (ग्रा.) यांचेकडे अपील दाखल करणेपूर्वी व त्याअनुषंगाने दिनांक १५/०६/२०२२ अन्वये "जैसे थे परिस्थिती (Status Quo)" आदेश पारित होण्यापुर्वीच दि. १४/०२/२०२२ वारसान दर्ज करण्याबाबतचे व दिनांक १३/०५/२०२२ रोजी वर्ग १ करण्याबाबतचे आदेश पारीत करण्यात आलेले आहे. त्यामुळे अपील दाखल असून सुध्दा दि. १३ मे, २०२२ च्या आदेशाप्रमाणे देवस्थानची मालमता वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये परिवर्तीत करून श्री. गौतमपुरी गोस्वामी यांना आर्थीक हव्यासापोटी मदत केल्याचे म्हणणे संयुक्तिक होणार नाही. सबब उपलब्ध कागदपत्रावरुन व वर नमूद बाबी वरुन सर्व संबंधीत अधिकारी विरुद्ध केलेले आरोप वस्तुस्थितीजन्य पुराव्यावरुन तथ्यहीन असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे त्यांचेविरुद्ध कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

*********************

एच-०६९३ -१अ.

**लक्षवेधी सूचना क्रमांक :- २२८**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. सुनिल प्रभू व श्रीमती यामिनी जाधव, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २२८ पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबईतील बोरीवली पूर्व येथील संजय गांधी राष्ट्रीथाय उद्यानातील वन विभागच्या जागेवर असलेल्या आदिवासी व बिगर आदिवासी मिळून सुमारे १३ हजार ७८६ झोपडीधारकांचे आरे वसाहतीमधील वन विभागाच्या ९० एकर जागेत एसआरए योजने अंतर्गत पुनर्वसन करण्याचे आश्वासन शासनाने दिनांक २४.०३.२०२२ रोजी देण्यात येऊनही अद्याप याबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास येणे, यामुळे गेल्या २० वर्षापासून वन विभागाच्या जागेतील अतिक्रमिक झोपडी धारकांच्या पुनर्वसनाबाबतची समस्या आजही पुनर्वसना अभावी कायम असणे, सदरहू उद्यानाच्या २५ हजार १४४ अतिक्रमिकांपैकी १३ हजार ७८६ पात्र कुटुंबाचे पुनर्वसन करण्यासाठी उद्यान व्यवस्थापनाने आरे येथील वन विभागाची ९० एकर जागा एसआरए प्राधिकरणाला दिनांक २८.११.२०१८ रोजी हस्तांतरीत करण्यात येणे, एकूण पात्र अतिक्रमिकांपैकी दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील सीएसक्र. २३९/१ मधील वन विभागाच्या जागेत १० हजार ६९१ अतिक्रमिक कुटुंबे झोपड्यामध्ये वास्तव्य करीत असून या पैकी ४ हजार ३५९ पात्र अतिक्रमिकांनी वन विभागास प्रति झोपडे ७ हजार रुपये रक्कम सन २००८ मध्ये भरण्यात आली असल्याने सदरहू अतिक्रमिक झोपडीधारकांचा सदर एसआरए योजनेत समावेश करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे करणे, एकंदरीत शासनाने पात्र १३ हजार ७८६ झोपडीधारकांचे एसआरए प्राधिकरणामार्फत पुनर्वसन करणेबाबत तातडीने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता, याकडे झालेले व होत असलेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सदर झोपडीधाकरांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिंतेचे वातावरण, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. सुधीर मुनगंटीवार**

### निवेदन

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे एकूण क्षेत्र १०४.०८ चौ. कि.मी. असून त्यापैकी ठाणे जिल्हयात ४२.३१ चौ.कि.मी., पालघर जिल्यात १६.९३ चौ.कि.मी व मुंबई उपनगर जिल्हयात ४४.८४ चौ.कि.मी. क्षेत्र आहे. याव्यतिरिक्त दिनांक १२.१०.२०२० रोजीच्या अधिसूचनेन्वये आरे येथील २.८६७ चौ.कि.मी. क्षेत्र भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ अन्वये "राखीव वन" म्हणून अधिसूचीत झाले असून सदर क्षेत्र संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या ताब्यात घेण्यात आले आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अतिक्रमणाबाबत मुंबई एन्हायमेंटल ॲक्शन ग्रुप यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ३०५/९५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. ०७.०५.१९९७ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील दिनांक ०१.०१.१९९५ पूर्वीच्या अतिक्रमकांचे उद्यानाबाहेर पुनर्वसन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामध्ये पहिला टप्प्यातील ११६५८ व दुसरा टप्प्यातील १३४८६ असे एकूण २५१४४ अतिक्रमक प्रथमदर्शनी पात्र ठरत आहेत. त्याव्यतिरिक्त संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील ४३ आदिवासी पाड्यांमधील आदिवासी कुटुंबांचे पुनर्वसनही प्रस्तावित आहे.

पहिल्या टप्प्यांत रक्कम भरलेल्या ११३५९ अतिक्रमकांचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत नियुक्त विकासकाने संघर्षनगर, चांदिवली येथे बांधलेल्या इमारतींमध्ये पुनर्वसन करणेत आले आहे. सदर

विकासकाकडून अद्याप २९९ सदनिका मिळणे शिल्लक असून त्या प्राप्त झाल्यानंतर पहिल्या टप्प्यातील पुनर्वसन प्रक्रीया पुर्ण होईल.

रिट याचिका क्र. ३०५/९५ मधील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशांमुळे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अतिक्रमीत नगरे व आदिवासी पाड्यांना नव्याने नागरी सुविधा पुरविता येत नाहीत. मात्र शासन स्तरावरील दिनांक २०.०४.२०१२, ११.०९.२०१३ व २७.०९.२०१३ रोजी झालेल्या बैठकींमधील निर्देशांनूसार संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणेकडून प्राप्त दाखल्याच्या आधारे अस्तित्वात असलेल्या नागरी सुविधांच्या दुरुस्तीस संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांचेकडून परवानगी देण्यात येते.

शासन निर्णय क्र. डब्ल्यू.एल.पी.-१२१७/प्र.क्र.३०३/फ-१ दि. २०.०२.२०१८ अन्वये गठीत उच्चस्तरीय सशक्तता समितीच्या शिफारशीनूसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या ताब्यातील मौजे मरोळ-मरोशी येथील न.भू.क्र. १६८९ पै, १६९० पै. व १६९७ पै. मध्ये पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन करण्याचे तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४.१०.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत ठरविण्यात आले आहे. या ठिकाणी सुमारे ४७ एकर क्षेत्रामध्ये पात्र अतिक्रमकांचे व उर्वरीत ४३ एकर क्षेत्रामध्ये आदिवासी कुटुंबांचे पक्की घरे, वीज, रस्ते, पाणी, गटारे इ. सर्व सोयीसुविधायुक्त पुनर्वसन करण्यात येणार होत. मात्र पुनर्वसनाकरीता TDR च्या मोबदल्यात इमारती बांधून देण्यासाठी म्हाडाद्वारे काढण्यात आलेल्या निविदेस ६ वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही प्रतिसाद न मिळाल्याने सदर निविदा रद्द करण्यात आली आहे.

पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन जलदगतीने मार्गी लावण्याकरीता दिनांक ३०.०९.२०२१ रोजी तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या बैठकीतील निर्णयानुसार पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसनाकरीता आरे व्यतिरीक्त इतर जागा निश्चित करण्यासाठी तत्कालीन मा. मंत्री, पर्यावरण, पर्यटन व राजशिष्टाचार तथा पालक मंत्री, मुंबई उपनगर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२.१२.२०२१ रोजीच्या शासन निणर्यान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीची दिनांक १३.०१.२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये आरे येथील जागेव्यतिरीक्त इतर संभाव्य जागेची निवड करुन अतिक्रमीत क्षेत्राची स्थानिक परिस्थिती विचरात घेवून लाभार्थी व संबंधीत विभाग यांना सोईस्कर ठरणारे क्षेत्र निश्चित करण्यासाठी सर्वसमावेशक सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबत गृहनिर्माण विभाग व नगर विकास विभाग यांना सुचना देण्यात आल्या आहेत.

*****

लक्षवेधी सूचना क्रमांक -: २५४

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन**

श्री. दौलत दरोडा, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २५४ पुढीलप्रमाणे आहे :-

" आज संपूर्ण देशात स्वातंत्रदिनाच्या अमृत महोत्सव साजरा करण्याकरिता मा. पंतप्रधान यांनी" "हर घर तिरंगा घर घर तिरंगा" अशी घोषणा करण्यात येणे, परंतु मुरबाड तालुक्यातील (जि. ठाणे) २२ आदिवासी विस्थापित कुटुंबाना अद्यापही घर देण्यात आले नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, संबंधित ठेकेदारांने या कुटुंबाना दर्जेदार घरे बांधून देण्याऐवजी पोल्ट्री फार्ममध्ये ढकलण्यात येऊन शासनाने लाखे रुपये ठेकेदाराने हडप करण्यात येणे, तसेच पालघर जिल्ह्यातील आदिवासीना हक्काचा निवारा मिळावा याकरिता राबविण्यात येणाऱ्या घरकूल योजनेतंर्गत आजही १२ हजार कुटुंबे वाऱ्यावर असून रस्ते, वीज, पाणी, आरोग्य सुविधाही उपलब्ध करण्यात न येणे, मा. पंतप्रधान यांनी "हर घर तिरंगा घर घर तिरंगा" अभियानानुसार या बेघरांना घरे उपलब्ध नसल्याने सदरील अभियांनात यांना सहभागी होता येत नसल्याने त्यांच्या निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, या संदर्भात शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन यांस दिरंगाई करणाऱ्यावर तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. सुधीर मुनगंटीवार**

**निवेदन**

भिमाशंकर वन्यजीव अभयारण्यातील मौजे साखरमाची, ता. आंबेगाव, जि. पुणे या गावामध्ये माळीण सारखी भुस्कलनाची दुर्घटना टाळण्याकरीता गावातील २० कुटुंबीयाचे तात्पुरत्या स्वरुपात पुनर्वसन करण्याचे ठरवण्यात आले होते. त्यानुसार श्री. शंकर नारायण देसले रा. साजई, ता. मुरबाड यांचे मालकीच्या स.नं. ३८ क्षेत्रावर तात्पुरते शेड उभारण्याकरीता जागा देण्याची विनंती करण्यात आली होती व सदर जागेवर २० कुटुंबांकरीता तात्पुरता निवारा म्हणून २० निवारा शेड, २ स्वच्छतागृह बांधण्याच्या अनुषंगाने दिनांक ३०.१०.२०१७ रोजी श्री. अशोक शंकर देसले यांचेशी दोन वर्षाकरीता करार करण्यात आला. सदर कामासाठी अंदाजपत्रकानुसार लागणारा रु. ४३,८२,९७४/- इतका निधी महूसल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक : पुनर्व-२०१८/प्र.क्र.११५/र-८, दिनांक १९.०१.२०१९ अन्वये मंजूर करण्यात आला होता.

सदर निधी २० खातेदारांच्या वैयक्तिक खात्यावर वर्ग करण्यात आला असून लाभार्थ्यांनी सदर कामे खाजगी कंत्राटदाराकडून करुन रक्कम खाजगी कंत्राटदाराना अदा केले आहेत. सदर कामाकरीता वन विभागाकडून कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नसून वन विभागामार्फत फक्त भाडेतत्वावर जागा उपलब्ध होण्यासाठी समन्वय साधण्यात आला आहे. उप वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे यांचेकडे प्रस्तुत प्रकरणी आर्थिक फसवणूक झाली असल्याची लाभार्थ्यांकडून तक्रार करण्यात आली होती. त्यानुसार सदर प्रकरण पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी वर्ग करण्यात आले आहे.

मौजे साखरमाची ता. आंबेगाव, जि. पुणे येथील कुटुंबांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनासाठी मौजे मुरबाड (लांबाचीवाडी) ता. मुरबाड येथील ६५ हेक्टर वन जमीनीवर करण्याचे प्रस्तावित असून त्याकरीता वन संवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत वन जमीन वळतीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरीता उप वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे यांचेकडून वनजमीन वळतीकरण्याचे प्रस्तावास मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

पालघर जिल्हयातील आदिवासींना हक्काचा निवारा मिळण्याकरीता शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, आदिम आवास योजना अशा विविध योजनांतर्गत सन २०२१-२२ मध्ये ११६१८ उद्दिष्टांपैकी १०७३४ लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी देण्यात आली असून उर्वरित लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी देण्याची कार्यवाही सुरू आहे.

*****

HB/1182(2) - 760 प्रती

<u>विधानसभा लक्षवेधी सूचना क्र. १८५</u>

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.सुनिल प्रभू,श्री. अजित पवार, श्री. जयंत पाटील, श्री.छगन भुजबळ, श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री.हसन मुश्रीफ, श्री. धनंजय मुंडे, डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.राजेश टोपे,डॉ. राजेंद्र शिंगणे, कुमारी आदिती तटकरे, श्री. अनिल पाटील, श्री. प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके, श्री. धर्मरावबाबा आत्राम, श्री. राजू कारेमोरे, श्री. मनोहर चंद्रिकापूरे, श्री. इंद्रनिल नाईक, श्री. चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे, श्री. संदिप शिरसागर, श्री. बाळासाहेब आजबे, श्री.शेखर निकम, श्री. राजेश नरसिंगराव पाटील, श्री. रोहित पवार, ॲड माणिकराव कोकाटे, श्री. मकरंद जाधव-पाटील, श्री. बबनराव शिंदे, श्री. प्राजक्त तनपूरे, श्री. दिलीपराव बनकर, श्री. बाबासाहेब पाटील वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८५ पुढील प्रमाणे आहे:**

" राज्यात शिक्षक पात्रता परिक्षेत (टीईटी) गैरप्रकार व गैरव्यवहार करुन सुमारे ७ हजार ८७४ विद्यार्थी पात्र ठरल्याचा तसेच अनेक विद्यार्थ्यांनी बनावट टीईटी प्रमाणपत्र सादर करुन नोकरी मिळविल्याचा गंभीर व धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस येणे, आरोग्यसेवक भरती प्रकरणाचा पुणे पोलीस तपास करीत असताना टीईटी परिक्षेत घोटाळा झाल्याचे स्पष्ट होणे, सदर प्रकरणात परिक्षा घेणारे खाजगी कंपन्यांचे संचालक, परिक्षा देणारे विद्यार्थी आणि परिक्षा परिषदेचे अधिकारी यांनी आर्थिक संगनमताने घोटाळा केल्याचे उघडकीस आल्यानंतर यामध्ये दोषींना अटक करण्यात येणे, सर्व ७ हजार ८७४ विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे रद्द करण्यात येऊन त्यांच्यावर टीईटी परिक्षा देण्यास कायमस्वरुपी बंदी घालण्यात येणे, परंतु, सदरहू घोटाळ्याची व्याप्ती व्यापक स्वरुपात असल्यामुळे सदर प्रकरणाची अंमलबजावणी संचालनालयाकडून (ईडी) समांतर चौकशी होण्याच्या वृत्तामुळे सदरहू घोटाळा प्रकरणाचा तपास ऐरणीवर येणे, सदर प्रकरणात परिक्षा आयुक्तांसह अनेकांचा संबंध असलेल्या या प्रकरणातून संबंधित यंत्रणात भ्रष्टाचाराची किड खोलवर गेली असल्याचे साडेसात हजाराहून अधिक उमेदवार संबधित प्रकरणांनी भरती प्रक्रियेची विश्वासार्हताच धोक्यात आणण्यात येणे, आदिच सरकारी नोकऱ्या झपाट्याने कमी होत असताना जे आहेत त्यासाठी किती तरी पटीने अधिक अर्ज शासनास प्राप्त होणे, शेकडांमधील जागांसाठी लाखोंच्या संख्येने उमेदवारांचे अर्ज येत असणे, यातूनच काही लाख रुपयांची लाच देऊन भ्रष्टाचाराच्या संधी उपलब्ध होणे, सदरहू व्यापक प्रमाणात असलेल्या टीईटी घोटाळ्याची सखोल चौकशी करुन अशा प्रकारचे घोटाळे होऊ नये याकरीता ठोस कठोर उपाययोजना करण्यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष परिणामी टीईटी परिक्षा उत्तीर्ण झालेल्या पात्र विद्यार्थ्यांवर झालेला व होत असलेला अन्याय, यामुळे जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

## मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन

सन २०२१ च्या म्हाडा नोकर भरती परिक्षेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत प्राप्त तक्रारीच्या तपासामध्ये सायबर पोलीस स्टेशन पुणे यांना शिक्षक पात्रता परीक्षा २०१९ मध्ये गैरप्रकार झाल्याची माहिती प्राप्त झाली. शिक्षक पात्रता परिक्षा २०१९ परिक्षेमध्ये, गुणांमध्ये फेरफार झाल्याबाबत सायबर पोलिस स्टेशन, पुणे येथे

दाखल झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने गु.र.नं. ५६/२०२१ व गु. र. नं. ५८/२०२१ दाखल झाला आहे. गुन्ह्याच्या अनुषंगाने तपासादरम्यान परीक्षार्थींच्या उत्तरपत्रिकांच्या केलेल्या तपासणीत ७८७४ उमेदवारांनी परिक्षेत गैरप्रकार केला असल्याचे उघडकीस आले असून त्यापैकी २९३ उमेदवारांनी बनावट कागदपत्रे सादर केली आहेत.

सदर प्रकरणातील फिर्यादी श्री. दत्तात्रेय जगताप, तत्कालीन अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेकडे E.D. कडील अधिकारी येऊन गेले आहेत. तथापि, कोणत्याही स्वरुपाचा पत्रव्यवहार/ नोटीस त्यांना देण्यात आलेली नाही, असे त्यांचेशी झालेल्या चर्चेनंतर समजते. E.D. ने शासनाशी संपर्क केलेला नाही.

सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांनी सादर केलेला प्रस्ताव, त्यापृष्ठ्यर्थ कागदपत्रे, पंचनामा व तपासा दरम्यान हस्तगत केलेल्या रकमेचा व दागिन्याचा पुरावा, व्हॉट्सअप चॅटींगची प्रत, साक्षीदार व आरोपी यांचे जबाब या सर्व बाबी विचारात घेता, गुन्हा क्र.५६/२०२१ व ५८/२०२१ मधील या विभागांतर्गत येणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याकरीता पुरेसा पुरावा उपलब्ध असल्याने खालील अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याबाबतच्या प्रस्तावास मा. मुख्यमंत्री महोदय स्तरावर मान्यता प्राप्त झाली आहे.

१) श्री.तुकाराम सुपे, तत्कालीन आयुक्त/अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे (गुन्हा क्र.५६/२०२१ व ५८/२०२१)

२) श्री.स्वप्नील तीरसींग पाटील, शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोराळे, ता. नांदगाव, जि. नाशिक (गुन्हा क्र.५६/२०२१/ व ५८/२०२१)

३) श्री.मुकुंदा जगन्नाथ सुर्यवंशी- शिक्षक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोराळे, ता. नांदगाव, जि. नाशिक (गुन्हा क्र.५६/२०२१ व ५८/२०२१)

४) श्री.राजेंद्र विनायक सोळुंखे, लिपीक, प्रगती विद्यालय, अमोदे, नांदगाव, नाशिक (गुन्हा क्र.५६/२०२१)

५) श्री.निखील वसंत कदम, कनिष्ठ लिपीक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय, पुणे (गुन्हा क्र.५८/२०२१)

मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्याबाबत विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही सुरु आहे.

तसेच टीईटी परीक्षा गैरव्यवहाराप्रकरणी दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करण्याकरीता सदर अंतरीम अहवालाची प्रत आयुक्त (शिक्षण), पुणे यांना पाठवून त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह विहीत नमुन्यातील शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव मागविण्याची कार्यवाही सद्य:स्थितीत सुरु आहे.

शिक्षक भरतीसाठीची टिईटी परीक्षा १०१९ मध्ये झालेल्या गैरप्रकारासंदर्भात आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी सादर केलेल्या अहवालास अनुसरुन शासनपत्र, दिनांक १०.०६.२०२२ अन्वये यामध्ये

समाविष्ट ७८७४ परीक्षार्थी यांना अपात्र घोषित करुन उर्वरीत पात्र परीक्षार्थींचा सुधारीत निकाल महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन त्यास यथायोग्य प्रसिद्धी देण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

सदर परीक्षार्थींची यादीप्रमाणे तपासणी करुन ते सद्य:स्थितीत जिल्हा परिषद अथवा खाजगी अनुदानित/अंशत: अनुदानित/विनाअनुदानित शाळेत कार्यरत असल्यास व सदर सेवेच्या अनुषंगाने त्यांना शालार्थ आयडी प्रदान केलेला असल्यास, शिक्षण संचालक यांनी यांचे स्तरावरुन प्रथमत: सदर शालार्थ आयडी पुढील आदेशापर्यंत गोठविण्याबाबत व संबंधित शाळांच्या व्यवस्थापनास त्यांच्या सेवा समाप्त करण्याची कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागीय उपसंचालकांनी सूचित करण्यात आले आहे. संबंधित विभागीय उपसंचालकांनी नियमानुसार सुनावणी घेऊन या परीक्षार्थींच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याची कार्यवाही करावी व त्यानंतर शालार्थ आयडी देखील रद्द करण्यात यावा, असेही सूचित करण्यात आले आहे.

त्यानुसार आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी दिनांक ०३.०८.२०२२ अन्वये शिक्षक भरतीतील टिईटी परीक्षा २०१९ मध्ये गैरप्रकार करुन पात्र ठरलेल्या ७८७४ उमेदवारांची संपादणूक कायमस्वरुपी रद्द करण्याची कार्यवाही व शास्ती निश्चित केली आहे. सदर आदेश महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत. महाआयटी मुंबई यांनी मॅपिंग केलेल्या उमेदवारांपैकी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये ४४७ उमेदवार कार्यरत असल्याचे दिसून येते यांचे शालार्थ आयडी गोठविण्याबाबत तांत्रिक बाबी पूर्ण केल्या आहेत. त्यानुसार माध्यमिक शिक्षण संचालनालयाने क्षेत्रीय यंत्रणांना सदर अपात्र कर्मचाऱ्यांचे माहे ऑगस्ट,२०२२ पासून वेतन काढण्यात येऊ नये असे कळविले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडील उपलब्ध यादीमधील शालार्थ प्रणालीमध्ये आधार क्रमांकाशी जुळणारे ५७६ उमेदवार प्राथमिक शिक्षण संचालनालयास आढळून आले आहेत. या उमेदवारांचे माहे ऑगस्ट,२०२२ चे वेतन अदा होणार नाही. याकरीता प्राथमिक शिक्षण संचालनालयाने सर्व क्षेत्रीय यंत्रणांना कळविले आहे. तसेच प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे आदेश दि.२२.०८.२०२२ अन्वये संबंधित कर्मचाऱ्यांच्या खाजगी शाळेतील कर्मचाऱ्यांबाबत वैयक्तिक मान्यता व शालार्थ आयडी रद्द करणे व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवा समाप्तीबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देशही संबंधित प्राधिकाऱ्यांना दिले आहेत.

शासन पत्र दिनांक ०३.०८.२०२२ अन्वये अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा (TAIT) परीक्षा २०२२ चे आयोजन बाह्य यंत्रणेमार्फत करुन घेण्यासाठी सक्षम व अनुभवी बाह्य यंत्रणा निवडण्यासाठी शासनाने तयार केलेल्या पॅनलमधून निविदा प्रक्रिया विहीत कार्यपध्दतीनुसार आयुक्त (शिक्षण) यांच्या नियंत्रणाखाली पार पाडण्याबाबत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांना कळविण्यात आले आहे.

सन २०१९-२०२० च्या अपप्रकाराची पुनरावृत्ती टाळण्याच्यादृष्टीने महाराष्ट्र राज्य परिषदेने महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा नोव्हेंबर,२०२१ च्या प्रकियेची सविस्तर अंतर्गत छाननी करावी व यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याची कटाक्षाने दक्षता घेण्याबाबत आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

****************

लक्षवेधी सूचना क्र.३२१

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. समाधान अवताडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

---

"जुलै २०२२ व त्या सुमारास सोलापूर जिल्हयातील श्री. भास्कर बाबर माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी केलेल्या मनमानी कारभाराचा व भ्रष्टाचाराचा प्रश्न ऐरणीवर येणे, सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालेतील मुख्याध्यापक भगवान महाडिक आणि संस्था यांच्यामध्ये वाद सुरु असणे, यातूनच मुख्याध्यापक भगवान महाडिक यांना संस्थेने सेवामुक्त केलेले असणे, त्या विरोधात मुख्याध्यापक श्री. महाडिक यांनी शाळा न्यायाधीकारणाकडे अपील दाखल केलेले असणे, त्यानंतर माध्यमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर यांनी १६ फेब्रुवारी २०२२ रोजी संस्थेने केलेल्या कारवाई विरोधात सेवामुक्त मुख्याध्यापक महाडिक यांना शाळेत हजर करून घेण्याचे आदेश दिलेले असणे, या आदेशाच्या विरोधात संस्थेने मा. उच्च न्यायालयात रीट याचिका दाखल केलेली असणे, हे प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाही माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी अधिकाराचा गैरवापर करुन संस्थेने सेवामुक्त केलेले मुख्यध्यापक भगवान महाडिक यांना हाताशी धरून संगणमताने सुमारे २९ लाख २५ हजार ५५ रुपये इतक्या रकमेचा गैरव्यवहार केलेला असणे, त्यामुळे त्यांना निलंबित करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी तक्रार संस्थेने पुणे येथील शिक्षण उपसंचालकांकडे केलेली असणे, या अगोदर देखील माध्यमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर यांचे विरोधात अनेक भ्रष्टाचाराची व मनमानी कारभाराची तक्रारी प्राप्त असणे, या तक्रारीची दखल घेऊन उपसंचालक श्री. औदुंबर उकिरडे यांनी श्री. भास्कर बाबर माध्यमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर यांची चौकशी करण्यासाठी द्विस्तरीय चौकशी समिती नियुक्ती केलेली असणे, पंधरा दिवसांमध्ये चौकशी करून तसा अहवाल शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे सादर करण्याचे आदेश देखील दिलेले असणे, परंतु अद्याप सदर प्रकरणी कोणतीही कार्यवाही झालेबाबतची दिसून न येणे यामुळे येथील स्थानिकांमध्ये व विशेषतः संबंधित संस्थेच्या पदाधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये प्रशासनाबाबतीत अन्यायाची व अविश्वासाची भावना निर्माण होणे, याबाबतीत शासनाने संबंधित माध्यमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर यांची उघड चौकशी लावून यांचेवर करावयाची निलंबनाची कारवाई व उपाययोजना ..."

---

## मा. श्री. दिपक केसरकर, मंत्री, शालेय शिक्षण यांचे निवेदन

कै. अण्णाभाऊ साठे प्रशाला, टाकळी रोड, पंढरपूर जि. सोलापूर येथे श्री. भगवानराव गंगाधर महाडिक हे दि.१४/०६/१९९९ ते १३/०६/२००४ या कालावधीमध्ये सहशिक्षक व दिनांक १४/०६/२००४ पासून मुख्याध्यापक या पदावर कार्यरत होते.

सदर संस्थेमध्ये वाद असल्याने संस्थेने श्री. महाडिक यांच्याविरुध्द चौकशी समिती गठीत करुन दि. २०/११/२०२१ च्या आदेशान्वये त्यांची सेवा समाप्त केली होती. सदर सेवा समाप्ती आदेशाविरुध्द श्री. महाडिक यांनी मा. शाळा न्यायाधिकरण, सोलापूर येथे अपील क्र.६३/२०२१ दाखल केलेले असून ते प्रलंबित आहे.

श्री.महाडिक यांना सेवामुक्त केल्यामुळे महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघ, सोलापूर संघटना यांनी दि. ३१/०१/२०२२ पासून प्रशालेसमोर आमरण उपोषण सुरु केले होते. उपोषणा दरम्यान श्री. महाडिक यांना बऱ्याच शिक्षक संघटनांनी पाठिंबा दर्शविला होता. तसेच आजी व माजी शिक्षक आमदार महोदयांनी व संघटना प्रतिनिधी यांनी मा. न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत श्री. महाडिक यांना सेवेत पुन्हा रुजू करुन घेऊन त्यांना व इतर ९ शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे नियमितपणे वेतन अदा करावे, अशी उपोषणावेळी मागणी केली होती. त्यामुळे शिक्षणाधिकारी (माध्य), सोलापूर यांनी दि. ०२/०२/२०२२ व १६/०२/२०२२ च्या पत्रान्वये श्री. महाडीक यांना बेकायदेशीररीत्या बडतर्फ केलेले असल्याने त्यांना तात्काळ पूर्ववतपणे मुख्याध्यापक पदी रुजू करुन घेण्याबाबत संस्थेस कळविले होते. सदर आदेशाविरुद्ध संस्थेने मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.२९०४/२०२२ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि. २२ मार्च, २०२२ च्या आदेशान्वये शिक्षणाधिकारी(माध्य.), जि. प. सोलापूर यांच्या दि.१६/०२/२०२२ च्या आदेशास पुढील सुनावणीपर्यंत स्थगिती दिली तसेच सदर स्थगिती आदेश पुढील सुनावणीपर्यंत चालू राहील असेही मा. उच्च न्यायालयाने दि.१९/०४/२०२२ च्या आदेशान्वये स्पष्ट केले. श्री. महाडिक व इतर ९ कर्मचारी यांचे प्रलंबित वेतनाची रक्कम रुपये २९ लाख २५ हजार ५५ अदा करण्यासाठी वेतन देयक शालार्थ वेतन प्रणालीत तयार करुन वेतन पथकामार्फत त्यांच्या बँक खात्यांवर वर्ग केले असल्याचे दिसून येते.

यासंदर्भात संस्थेने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करण्याकरीता विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, सोलापूर व प्रशासन अधिकारी, सोलापूर महानगरपालिका यांच्या नेमलेल्या द्विस्तरीय समितीने दि. २०/०८/२०२२ अन्वये चौकशी अहवाल सादर केला आहे. चौकशी समितीच्या अहवालानुसार संस्थेने श्री. महाडीक यांच्या सेवा समाप्त करण्यापुर्वी अथवा चौकशी समिती गठित करण्यापुर्वी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि. प. सोलापूर यांची परवानगी घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नसल्याचे तसेच संस्थेच्या सेवासमाप्ती आदेशाविरुद्ध मुख्याध्यापक श्री. महाडीक यांनी मा.शाळा न्यायाधिकारण, सोलापूर येथे दाखल केलेल्या अपील क्र.६३/२०२१ वरील निर्णय प्रलंबित असताना श्री. महाडीक यांनी वेतन देयकांवर स्वाक्षरी केलेली असून त्यास शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी परवानगी दिलेली आहे. यास्तव श्री. महाडिक यांना रुजू होऊन वेतन काढण्याबाबत शिक्षणाधिकारी (माध्य.), जि. प. सोलापूर यांनी दिलेले आदेश बेकायदेशीर असल्याचे समितीस आढळून आले आहे. तसेच सदर शाळेच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शालेय कामकाज केले असल्याची खात्री न करता श्री.महाडीक यांच्या स्वाक्षरीने वेतन काढले आहे. शाळा न्याधिकरणाकडील अपील प्रलंबित असल्याने सदर कार्यवाही नियमानुसार नसल्याचे समितीस दिसून आले आहे.

संस्थेच्या तक्रारीत अंशत: तथ्य असल्याचे अहवालात नमूद करुन शिक्षणाधिकारी (माध्य), जि.प. सोलापूर यांनी प्रशासकीय अनियमितता केल्याचा निष्कर्ष समितीने नोंदविला आहे. सदर प्रकरणी आढळून येणाऱ्या दोषीं अधिकारी यांचेविरुध्द नियमानुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल.

******************************************************

महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन**

**महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.७१४**

**डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढील प्रमाणे आहे:-**

"व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँक मर्या, बीड या बँकेच्या भारतीय रिझर्व बँकेच्या तपासणीसह विशेष लेखा परिक्षणात अनेक गंभीर आक्षेप नोंदविण्यात येणे, मंत्री बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन रिझर्व बँकेने प्रशासकाची नियुक्ती करणे, दि.९ मार्च २०२२ पासून बँकेविरुध्द कलम ३५-अ नुसार आर्थिक निर्बंध जारी होणे, बँकेच्या तत्कालीन अध्यक्ष व इतरांविरुध्द २२९ कोटी रुपयांच्या अपहार प्रकरणी बीड पोलिसात गुन्हा दाखल होणे, आर्थिक गुन्हे शाखा, बीड यांच्याकडून गुन्ह्याच्या तपासात अक्षम्य हलगर्जीपणा सह दिरंगाई होणे, तक्रारदाराने गुन्ह्याचा तपास राज्य आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्याची मागणी करणे, धनादेश न वटवता २३१ कोटी रक्कमेची उचल, संशयास्पद भरणा व त्याचा विनियोग या बाबत पोलिसांनी कोणताही तपास केलेला नसणे, वर्षानुवर्षे शाखा येणे-देणे या शिर्षाखाली सुरु असलेला गैरव्यवहार संगनमताने पाठीशी घालणाऱ्या लेखापरिक्षक, तत्कालीन जिल्हा विशेष लेखापरिक्षक यासह चाचणी लेखापरिक्षकांना गुन्ह्यात अद्याप सहआरोपी करण्यात आलेले नसणे, बँकेचे तत्कालीन अध्यक्ष व त्यांच्या कुटुंबीय व नातेवाईकांशी संबंधित संस्था व व्यवसाय यांच्यामध्ये झालेल्या आर्थिक व्यवहाराबाबत कोणतीही कारवाई झालेली नसणे, बँकेचे फॉरेन्सिक ऑडिट करण्यास अक्षम्य दिरंगाई होणे, ऐपत नसणाऱ्या व्यक्तिच्या नावाने बनावट फर्म व व्यवसाय दाखवून कर्ज उचल केल्याप्रकरणी बँकेचा विश्वासघात करणाऱ्या ३३ कर्जदारांना बँक प्रशासकांनी नोटीस देणे, या ३३ कर्जदारांची पोलिसांनी अद्याप कोणतीही चौकशी केलेली नसणे, बनावट कर्जदारांनी उचल केलेल्या ६३ कोटी रक्कमेच्या विनियोगाबाबत पोलिसांनी कोणताही सखोल तपास किंवा मनीट्रेल केलेला नसणे, कर्ज रक्कमेचा विनियोग यापैकी श्री.गरड यांच्या नावे बँकेच्या तत्कालीन अध्यक्षांनी कोट्यावधी रुपये कर्ज उचलून अपहार केल्याची तक्रार पोलिसांकडे देवूनही अद्याप गुन्हा नोंद झालेला नसणे, गुन्ह्यातील आरोपी तीन महिन्यांपासून अंतरीम जामीनवर असतानाही पोलिसांनी त्यास कोणताही विरोध न करणे, आरोपींनी नाममात्र व्याजदराने अपहारीत रक्कमेपैकी काही रक्कम बँकेत भरणा करणे, भरणा केलेल्या संशयित रक्कमांची चौकशी करण्याची आवश्यकता असणे, सर्वसामान्य ठेवीदार, छोटे व्यावसायिक यांच्या ठेवी मंत्री बँकेत सुरक्षित नसणे, बँकेचे तत्कालीन अध्यक्ष व इतरांनी संगनमताने सर्वसामान्यांच्या पैशांचा अपहार केलेला असणे, व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेतील गैरव्यवहार प्रकरणी दोषीविरुध्द कडक कारवाई करुन गुन्ह्यातील तपासकामी झालेल्या अक्षम्य विलंबास जबाबदार असणाऱ्याविरुध्द शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासन प्रतिक्रिया"

---

**मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन-**

द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँक लि. बीड या बँकेच्या सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणामध्ये गंभीर स्वरुपाच्या अनियमितता निदर्शनास आल्यामुळे रिझर्व्ह बँकेने त्यांच्या दि. २४.०९.२०२१ रोजीच्या आदेशान्वये सदर बँकेवर निर्बंध लावून महाराष्ट्र सहकारी संस्था

अधिनियम, १९६० चे कलम ११० A(iii) बँकेवर प्रशासकाची नियुक्ती करण्याचे आदेश सहकार आयुक्तांना दिले. त्यानुसार सहकार आयुक्तांनी बँकेवर दि. २४.०९.२०२१ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली. सध्यस्थितीत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासक मंडळ कार्यरत आहे.

रिझर्व्ह बँकेने द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेची सन २०१५-१८ या कालावधीत झालेल्या आर्थिक व्यवहारासंदर्भात विशेष तपासणी केली. सदर विशेष तपासणी अहवालात बँकेच्या तत्कालीन प्रशासनाने गुन्हेगारी कार्यपध्दतीचा अवलंब करुन अपहार केला असल्याचे रिझर्व्ह बँकेस निदर्शनास आले. सदर अहवालाच्या अनुषंगाने सहकार विभागाने बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी अशा २५ जणांवर पोलीस स्टेशन, शिवाजीनगर, बीड येथे गुन्हा क्र. ४५४/२०२१ दि. १७.१२.२०२१ रोजी दाखल केला. त्यानुषंगाने सदर गुन्हयातील आरोपीतांना CrPC चे कलम ४१(अ) (१) प्रमाणे नोटीस देवून जबाब नोंदविण्यात आलेले आहेत. आरोपीतांची बँक खात्याची माहीती हस्तगत करुन बँक खाते गोठवण्यात आलेले आहेत. तसेच पोलीस विभागामार्फत पुढील तपास सुरु आहे.

सध्यस्थितीत गुन्हयातील एकुण १९ आरोपींना मा. सत्र न्यायालय, बीड यांनी अंतिम जामीन तसेच ५ आरोपींना अंतरीम जामीन मंजुर केलेला आहे. सदर जामीन रद्द व्हावा म्हणुन पोलिस प्रशासनाने मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे अपिल दाखल केलेले असुन सदर अपिल सद्यस्थितीत प्रलंबित आहेत.

दरम्यान बँकेमधील आर्थिक अनियमिततेमुळे रिझर्व्ह बँकेने सदर बँकेवर दि. ०९.०३.२०२२ रोजी ६ महिन्याकरीता निर्बंध लादले होते. सदर निर्बंधाची मुदत दि. ०९.१२.२०२२ रोजी पर्यंत वाढविण्यात आली असून त्यानुसार कर्मचाऱ्यांचे वेतन, वीजबिले, भाडे, स्टेशनरी इ. आवश्यक खर्च वगळता इतर खर्चासाठी रिझर्व्ह बँकेची परवानगी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

बँकेतील सर्व संशयास्पद खात्यांचे डिजीटल फॉरेन्सिक ऑडीट करण्याकरीता डिजीटल फॉरेन्सिक ऑडीटर म्हणुन हेलिक ॲडव्हायझरी लि. मुंबई या कंपनीची नेमणुक केलेली असुन गुन्हयासंदर्भात माहीती त्यांना पाठविण्यात आलेली आहे. सदर कंपनीकडून पुढील कार्यवाही सुरु आहे.

भारतीय विमा नियामक मंडळ मुंबई कडून (DICGC) क्लेम करीता पात्र ४६,९५४ खातेदारांपैकी २८४३ खातेदारांना एकूण रु. ४४.९२ कोटी इतकी रक्कम अदा करण्यात आली असुन, उर्वरीत खातेदारांना क्लेमच्या रक्कमा परत करण्याचे काम सुरु आहे.

****

H-701-1-a,